**पेरणी करणाऱ्याचा दाखला**. मती १३:१-८ s

जेव्हा नगर नगर मधून लोकांची गर्दी त्याच्याकडे येत होती तेव्हा त्याने त्यांना एक दाखला सांगितला,

एक शेतकरी आपले बी पेरण्यासाठी गेला त्याने जेव्हा बी पेरले तेव्हा काही बी वाटेवर पडले व ते पायाच्या खाली तुडविले गेले.

काही बी काट्यांमध्ये पडले ते वाढले परंतु काट्यांमुळे दाबले गेले.

काही बी चांगल्या जमिनीत पडले ते उगविले व शंभर पट्ट पेक्षा अधिक फळ आले ह्या गोष्टी सांगत असता मोठया आवाजाने सांगितले, ज्यांच्या जवळ ऐकावयास कान आहेत त्यांनी ऐकावे.

त्यांच्या शिष्यांनी त्याला विचारले या दाखल्याचा अर्थ काय आहे?

तो त्यांना म्हणाला, परमेश्वरच्या राज्याविषयी रहस्य जाणून घेण्याचे तुम्हला दिले आहे. परंतु दुसऱ्यांना दाखल्याद्वारे दिले आहेत. ह्यासाठी की त्यांना दिसत असता पाहू नये व ऐकत असता समजू नये.

या दाखल्याचा अर्थ असा आहे बी परमेश्वराचे वचन आहे.

जे बी वाटेवर पडले होते ते हे व्यक्ती आहेत की वचन ऐकतात तेव्हा सैतान येऊन त्यांच्या मनातून वचन काढून घेतो. यासाठी की ते विश्वास करू नये व त्यांचे तारण होऊ नये.

जे बी खडकाळ जमिनीत पडले ह्याचा अर्थ हा आहे जे व्यक्ती जेव्हा वचन ऐकतात व आनंदाने ग्रहण करतात परंतु त्यांचा विश्वास मजबूत नसतो. म्हणून ते काही वेळापर्यंत विश्वास करतात व परीक्षा आली की विश्वास करत नाही.

व जे बी काट्यामध्ये पडले आहेत त्यांचा अर्थ हा आहे की जे व्यक्ती वचन ऐकतात परंतु जेव्हा ते आपल्या वाटी जातात, तेव्हा चिंता धन दौलत व जीवनातील सुख दुख ह्यांच्यात दाबून जातात.त्यांच्या वर पक्के फळ येत नाही.

. व चांगल्या जमिनीवर पडलेले बी ह्याचा अर्थ हा जे व्यक्ती जे चांगल्या व खऱ्या मनाने वचन ऐकतात. त्याला ते ग्रहण पण करतात पुन्हा ते आपल्या धीराने फळ देतात.